भारत सरकार

**विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# महसूल वसुली अधिनियम, १८९०

**(सन १८९० चा अधिनियम क्रमांक १)**

[दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान]

# The Revenue Recovery Act, 1890

**(Act No. 1 of 1890)**

**[ As in force on the 31st January, 2002]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

**[ किंमत : रु. ४.०० ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान असलेला दि रेव्हेन्यू रिकव्हरी ॲक्ट, १८९० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक १, दिनांक २३ जानेवारी, २००३ यात पृष्ठ २८ ते ३१ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २३ जानेवारी, २००३.

**सुभाष सी. जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Revenue Recovery Act, 1890 as on the 31st January, 2003 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 1, Vol. 12, dated 23rd January, 2003 on pages 28 to 31.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 23rd January, 2003.

SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

एच ४१३८—१ (१०३५—१—२००४)

# महसूल वसुली अधिनियम, १८९०

## कलमांचा क्रम

कलमे


१. नाव आणि विस्तार.

२. व्याख्या.

३. सरकारला येणे असलेल्या रकमा जेथे प्रदेय होतात त्या जिल्ह्यांखेरीज अन्य जिल्ह्यांत आदेशिका बजावून त्यांची वसुली.

४. लगतपूर्व कलमाखाली वसूल केलेली रक्कम भरण्याचे दायित्व नाकारणाऱ्या व्यक्तीला उपलब्ध असलेला उपाय.

५. अन्य सरकारी अधिकाऱ्यांनी किंवा स्थानिक प्राधिकरणांनी महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करावयाच्या रकमांची जिल्हाधिकाऱ्यांनी वसुली करणे.

६. या अधिनियमाखाली विक्रीस पात्र असलेली मालमत्ता.

७. महसुलासंबंधीच्या स्थानिक विधींची व्यावृत्ती.

८. भारताबाहेर उद्‌भवणाऱ्या विवक्षित सरकारी येण्यांची भारतात वसुली.

९. ब्रह्मदेशात प्रोद्‌भूत होणारे जमीन महसूल, इत्यादींची भारतात वसुली.

१०. विशिष्ट प्रकरणात वसूल केलेले पैसे पाठवून देणे जिल्हाधिकाऱ्याचे कर्तव्य.

अनुसूची.

# महसूल वसुली अधिनियम, १८९०

## (१८९० चा अधिनियम क्रमांक १)

(३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान)

[ १४ फेब्रुवारी, १८९० ]

**सरकारला येणे असलेल्या विवक्षित रकमा वसूल करण्याबाबत अधिक परिणामकारक उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, सरकारला येणे असलेल्या विवक्षित रकमा वसूल करण्यासाठी अधिक परिणामकारक तरतूद करणे समयोचित आहे, त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

नाव आणि विस्तार.

१. (१) या अधिनियमास, 'महसूल वसुली अधिनियम, १८९०' असे म्हणावे.

(२) जम्मू आणि काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.

व्याख्या.

२. या अधिनियमात, विषय अगर संदर्भ यामध्ये काहीही प्रतिकूल नसेल तर,—

(१) "जिल्हा" यात इलाखा शहराचा समावेश आहे;

(२) "जिल्हाधिकारी" याचा अर्थ, जिल्ह्याच्या जमीन महसूल प्रशासनाचा मुख्य प्रभारी अधिकारी, असा आहे ; आणि

(३) "कसूरदार" याचा अर्थ, जिच्याकडून जमीन महसुलाची थकबाकी किंवा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य असलेली रक्कम प्रदेय आहे अशी व्यक्ती, असा आहे, आणि अशा कोणत्याही थकबाकीचा किंवा रकमेचा भरणा होण्यासाठी प्रतिभू म्हणून जबाबदारी असलेल्या व्यक्तीचा यात समावेश आहे.

सरकारला येणे असलेल्या रकमा जेथे प्रदेय होतात त्या जिल्ह्यांखेरीज अन्य जिल्ह्यांत आदेशिका बजावून त्यांची वसुली.

३. (१) जेथे जमीन महसुलाची थकबाकी प्रोद्भूत झाली किंवा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य रक्कम प्रदेय झाली त्या जिल्ह्याखेरीज अन्य जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याला, कसूरदार त्या जिल्ह्यात असल्यामुळे किंवा तेथे त्याची मालमत्ता असल्यामुळे ती थकबाकी किंवा ती रक्कम प्रदेय असेल त्याबाबतीत तो जिल्हाधिकारी त्या अन्य जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडे अनुसूचीत दिलेल्या प्रपत्राशी शक्य तितके जुळणारे असे एक प्रमाणपत्र, त्यात पुढील गोष्टी नमूद करून पाठवू शकेल,—

(क) कसूरदाराचे नाव आणि त्याची ओळख पटण्यासाठी आवश्यक असेल असा अन्य तपशील; आणि

(ख) त्याच्याकडून प्रदेय असलेली रक्कम आणि कोणत्या लेख्याप्रमाणे ती प्रदेय आहे, तो लेखा.

(२) प्रमाणपत्र देणाऱ्या जिल्हाधिकाऱ्याकडून किंवा असा जिल्हाधिकारी ज्या अधिकाऱ्याकडे लेखी आदेशाद्वारे हे काम सोपवील अशा एखाद्या अधिकाऱ्याकडून ते स्वाक्षरित करण्यात येईल, आणि या अधिनियमाद्वारे अन्यथा उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, ते प्रमाणपत्र त्यात उल्लेखिलेल्या बाबींचा निर्णायक पुरावा असेल.

(३) प्रमाणपत्र मिळाल्यावर त्या अन्य जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, त्यात उल्लेखिलेली रक्कम, ही जणू काही त्याच्या स्वतःच्या जिल्ह्यात प्रोद्भूत झालेली जमीन महसुलाची थकबाकी असावी त्याप्रमाणे ती वसूल करण्याची कार्यवाही करील.

लगतपूर्व कलमाखाली वसूल केलेली रक्कम भरण्याचे दायित्व नाकारणाऱ्या व्यक्तीला उपलब्ध असलेला उपाय.

४. (१) प्रमाणपत्रात नमूद केलेल्या रकमेच्या वसुलीसाठी लगतपूर्व कलमाखाली एखाद्या व्यक्तीविरुद्ध कार्यवाही करण्यात आली असेल त्यावेळी, त्या व्यक्तीने ती रक्कम किंवा तिचा कोणताही भाग भरण्याचे दायित्व नाकारले आणि भरणा करतेवेळी तिने किंवा तिच्या अभिकर्त्याने आपल्या सहीनिशी लेखी निषेध नोंदवून भरणा केला तर, ती व्यक्ती अशाप्रकारे भरणा केलेल्या रकमेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या परतफेडीसाठी वाद मांडू शकेल.

(२) पोटकलम (१) खालील वाद हा प्रमाणपत्र देणाऱ्या जिल्हाधिकाऱ्याचे कार्यालय ज्या स्थानिक क्षेत्रात असेल तेथे अधिकारिता असलेल्या दिवाणी न्यायालयात मांडला गेला पाहिजे आणि जेथे थकबाकी प्रोद्भूत झाली किंवा ती रक्कम भरण्याचे दायित्व उद्भवले त्या ठिकाणी अंमलात असलेल्या कायद्यानुसार तो वाद निर्णीत केला जाईल.

(३) लगतपूर्व कलमात काहीही असले तरी, परंतु पूर्वोक्त ठिकाणी अंमलात असलेल्या कायद्याच्या अधीनतेने, त्या वादात वादीला प्रमाणपत्रात नमूद केलेल्या कोणत्याही बाबींसंबंधात पुरावा देता येईल.

(४) ज्या कोणत्याही राज्यावर या अधिनियमाचा विस्तार असेल त्या राज्यातील जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्रात नमूद केलेल्या रकमेच्या वसुलीसाठी, पाकिस्तानच्या किंवा ब्रह्मदेशाच्या कायद्याचा भाग म्हणून अंमलात असताना या अधिनियमाखाली अथवा पाकिस्तानच्या किंवा ब्रह्मदेशाच्या कायद्याचा भाग असलेल्या अन्य कोणत्याही तत्सम अधिनियमाखाली एखाद्या व्यक्तीविरुद्ध पाकिस्तानात किंवा, प्रकरणपरत्वे, ब्रह्मदेशात कार्यवाही करण्यात आली असेल तर, हे कलम लागू होईल.

**अन्य सरकारी अधिकाऱ्यांनी किंवा स्थानिक प्राधिकरणांनी महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करावयाच्या रकमांची जिल्हाधिकाऱ्यांनी वसुली करणे.**

५. जेथे जिल्हाधिकाऱ्याहून अन्य कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याने किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने जमीन महसुलाची थकबाकी म्हणून कोणतीही रक्कम वसूल करावयाची असते तेथे, त्या अधिकाऱ्याचे किंवा प्राधिकरणाचे कार्यालय ज्या जिल्ह्यात असेल त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, त्या अधिकाऱ्याच्या किंवा प्राधिकरणाच्या विनंतीवरून, ती रक्कम म्हणजे जणू काही त्याच्या स्वतःच्या जिल्ह्यात प्रोद्भूत झालेली जमीन महसुलाची थकबाकी असावी त्याप्रमाणे ती वसूल करण्याची कार्यवाही करील आणि ती रक्कम जणू काही स्वतःला प्रदेय असावी त्याप्रमाणे तो या अधिनियमाच्या पूर्वगामी उपबंधांखाली दुसऱ्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडे वसूल करावयाच्या रकमेचे प्रमाणपत्र पाठवू शकेल.

**या अधिनियमाखाली विक्रीस पात्र असलेली मालमत्ता.**

६. (१) जेव्हा, एखाद्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास या अधिनियमाखालील प्रमाणपत्र मिळेल तेव्हा, तो जिल्हाधिकारी त्या जिल्ह्यातील कसूरदाराची कोणतीही स्थावर मालमत्ता हस्तांतरित किंवा प्रभारित करण्यास बंदी करणारा जाहीरनामा काढू शकेल.

(२) जिल्हाधिकाऱ्यास कोणत्याही वेळी, लेखी आदेशाद्वारे जाहीरनामा मागे घेता येईल आणि प्रमाणपत्रात नमूद केलेली रक्कम वसूल झाली किंवा त्या रकमेच्या वसुलीसाठी मालमत्ता विकण्यात आली की, तो जाहीरनामा मागे घेण्यात आला असे मानण्यात येईल.

(३) जाहीरनामा निघाल्यानंतर आणि तो मागे घेतला जाण्यापूर्वी कसूरदाराच्या मालमत्तेचे किंवा तीमधील त्याच्या हितसंबंधाचे विक्री, दान किंवा गहाण याद्वारे किंवा अन्यथा खाजगी रीत्या झालेले अन्यक्रामण (शासनाच्या पुरते) आणि प्रमाणपत्रात नमूद केलेल्या रकमेच्या वसुलीसाठी केलेल्या विक्रीच्या वेळी जी व्यक्ती ती मालमत्ता खरेदी करील तिच्यापुरते शून्य ठरेल.

(४) या कलमाच्या पूर्वगामी उपबंधाच्या अधीनतेने, जेव्हा प्रमाणपत्रात नमूद केलेल्या रकमेच्या वसुलीसाठी या अधिनियमाखाली कोणत्याही स्थावर मालमत्तेविरुद्ध कार्यवाही करण्यात येईल तेव्हा कसूरदाराच्या त्यातील हितसंबंधाविरुद्धच फक्त अशी कार्यवाही करण्यात येईल आणि त्याने सद्‌भावपूर्वक निर्माण केलेले कोणतेही भार, केलेली अनुदाने किंवा केलेल्या संविदा केवळ त्या हितसंबंधाविरुद्ध कार्यवाही करण्यात आली म्हणून विधिबाह्य ठरणार नाहीत.

(५) या कलमाखालील जाहीरनामा दवंडी पिटवून किंवा अन्य रूढ पद्धतीने आणि ज्या मालमत्तेशी तो संबंधित आहे तीत किंवा तिच्या जवळपास एखाद्या ठळक ठिकाणी त्याची प्रत लावून काढण्यात येईल.

**महसुलासंबंधीच्या स्थानिक विधींची व्यावृत्ती.**

७. पूर्वगामी कलमांतील कोणतीही गोष्ट,—

(क) जमीन महसुलाच्या वसुलीसाठी किंवा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य असलेल्या रकमांच्या वसुलीसाठी त्या त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमितीद्वारे उपबंधित केलेल्या कोणत्याही प्रतिभूतीस हानी पोचवते किंवा त्या अधिनियमितीच्या उपबंधावर परिणाम करते; किंवा

(ख) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीखाली नगरपालिकेवर हुकूमत असलेली महानगरपालिका, आयुक्त, समिती, मंडळ, सभा किंवा व्यक्ती यांना प्रदेय असलेला कोणताही कर वसूल करण्यासाठी एखाद्या व्यक्तीस अटक करण्यास प्राधिकृत करते,

असा त्या गोष्टीचा अर्थ लावण्यात येणार नाही.

**भारताबाहेर उद्‌भवणाऱ्या स्थानिक क्षेत्रातील विवक्षित सरकारी येण्यांची भारतात वसुली.**

८. केंद्र सरकारच्या प्रशासनाखाली असलेल्या, भारताचा भाग नसलेल्या अशा कोणत्याही स्थानिक क्षेत्राला जेव्हा, अधिनियम लागू करण्यात आलेला असेल तेव्हा, त्या स्थानिक क्षेत्रात प्रोद्‌भूत होणारी जमीन महसुलाची थकबाकी किंवा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य असलेली रक्कम जिल्हाधिकाऱ्याला किंवा अन्य सरकारी अधिकाऱ्याला किंवा त्या स्थानिक क्षेत्रातील एखाद्या स्थानिक प्राधिकरणाला प्रदेय असेल तर, ती या अधिनियमाखाली भारतात वसूल करता येईल.

**ब्रह्मदेशात प्रोद्‌भूत होणारे जमीन महसूल, इत्यादींची भारतात वसुली.**

९. (१) ब्रह्मदेशामध्ये प्रोद्‌भूत होणाऱ्या जमीन महसुलाची थकबाकी किंवा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून ब्रह्मदेशात वसुलीयोग्य असलेली रक्कम ब्रह्मदेशातील जिल्हाधिकाऱ्याला किंवा अन्य सरकारी अधिकाऱ्याला किंवा स्थानिक प्राधिकरणाला प्रदेय असेल तर, ती रक्कम भारतात या अधिनियमाखाली वसूल करता येईल असे केंद्र सरकार निदेशित करू शकेल आणि तदनंतर अशी थकबाकी किंवा रक्कम अशा प्रकारे वसुलीयोग्य होईल :

परंतु, भारतात प्रोद्‌भूत होणारी थकबाकी भारतामध्ये निषेध नोंदवून भरणा करणाऱ्या व्यक्तीस या अधिनियमाच्या कलम ४ खाली भारतात उपलब्ध असलेला उपाय हा, ब्रह्मदेशात प्रोद्‌भूत होणारी थकबाकी भारतामध्ये निषेध नोंदवून भरणा करणाऱ्या व्यक्तीस ब्रह्मदेशात, ब्रह्मदेशाच्या कायद्याखाली उपलब्ध आहे याबाबत केंद्र सरकारची खात्री झाल्याशिवाय, ते असा कोणताही निदेश देणार नाही.

(२) ब्रह्मदेशामध्ये अंमलात असलेल्या आयकर किंवा अधिकर यांच्या संबंधातील अधिनियमितीखाली देय असलेली कराची कोणतीही थकबाकी किंवा दंड यांची या कलमाच्या आधारे वसुली करण्यासाठी, जिल्हाधिकाऱ्याला, आयकर अधिनियम, १९२२ (१९२२ चा ११), कलम ४६ (२) च्या परंतुकाखाली भारतीय आयकर आणि अधिकर याबाबत त्याला असल्याप्रमाणे जादा शक्ती असतील.

(३) पोट कलमे (१) व (२) ही ब्रह्मदेशाच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू आहेत त्याप्रमाणे ती पाकिस्तानच्या संबंधात लागू होतील.

विशिष्ट प्रकरणात वसूल केलेले पैसे पाठवून देणे हे जिल्हाधिकाऱ्याचे कर्तव्य.

१०. जेव्हा एखाद्या जिल्हाधिकाऱ्याकडे या अधिनियमाखाली अन्य राज्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडून किंवा पाकिस्तान किंवा ब्रह्मदेश येथील जिल्हाधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र येईल तेव्हा, त्या प्रमाणपत्राच्या आधारे त्याने वसूल केलेली कोणतीही रक्कम त्यातून त्यासंबंधातील त्याचा स्वत:चा खर्च वजा करून तो त्या जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवून देईल.

# अनुसूची

## प्रमाणपत्र

[कलम ३, पोट-कलम (१) पहा]

जिल्हाधिकारी ................................,

यांजकडून

जिल्हाधिकारी ........................ यांस ........................................

दिनांक ................................

............................ (वडिलांचे नाव) ........................ राहणार

(हे आपल्या जिल्ह्यात ............................ या ठिकाणी आहेत असे समजते)

(आपल्या जिल्ह्यात ............................ या ठिकाणी त्यांची मालमत्ता आहे असे समजते)

व त्यांच्याकडून ............................ याकरिता रु. ................................

इतकी रक्कम येणे आहे.

महसूल वसुली अधिनियम, १८९० च्या उपबंधाच्या अधीनतेने, उक्त रक्कम जणू काही आपल्या स्वतःच्या जिल्ह्यात प्रोद्भूत झालेली जमीन महसुलाची थकबाकी असावी त्याप्रमाणे आपण वसूल करायची आहे आणि आपण ती वसूल करून ........................ येथील माझ्या कार्यालयाकडे पाठवून द्यावी असे याद्वारे आपणांस विनंती करण्यात येत आहे.

क. ख.,

जिल्हाधिकारी ........

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई